# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४(१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ

*( परीक्षा विभाग )*

एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली–४४२६०५

फोन नंबर ०७१३२–२२३३५२


जा. क्रं./गों.वि./परीक्षा विभाग/१७९२/२०१५ दि. ०७/०९/२०१५

# अधिसुचना

(हिवाळी २०१५ च्या परीक्षेकरीता)

**संदर्भ :– जा.क्रं.गोंवि./परीक्षा विभाग/११५३/२०१५, दि. ०३/०६/२०१५.**

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य तथा संबंधीत सर्वांना कळविण्यात येते की, हिवाळी २०१५ च्या परीक्षेची कार्यवाही सुरू असून पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमा मधील सर्व सेमीस्टर व वार्षीक अभ्यासक्रम तसेच पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या नियमित, माजी व बर्हि:शाल विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र महाविद्यालयांच्या Login ID वर उपलब्ध करण्यात येत आहे.

विद्यापीठ नियमानुसार अभ्यासक्रमनिहाय परीक्षा शुल्क आकारून सदर शुल्काचे धनाकर्ष (डी.डी.) **"वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली"** यांच्या नावाने **दिनांक २५/०९/२०१५** पर्यंत काढणे आवश्यक आहे. सदर डी.डी.राष्ट्रीयकृत बॅंकेचा असावा व बॅंक ऑफ इंडीया, गोंडवाना विद्यापीठ शाखा गडचिरोली येथे देय असावा सोबत विहीत नमुन्यातील **प्रपत्र –१ ( तिन प्रतित ), परीक्षा शुल्काचे विवरण पत्र,** Format Ex – 22 (३ प्रतित), Declaration Form इत्यादी अचुक भरून Online Inward करून Exam Form Submission Report प्राचार्यांची स्वाक्षरी व शिक्कासह प्रमाणित करून संबंधीत लिपीकामार्फत **दिनांक ३०/०९/२०१५** या अंतिम दिनांकापर्यंत विद्यापीठात सादर करावे. व **परीक्षा आवेदनपत्र महाविद्यालयात जमा ठेवण्यात यावे.** याची सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्य व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

वरील विहीत मुदतीनंतर येणाऱ्या परीक्षा आवेदन पत्रावर संबंधीत अभ्यासक्रमाच्या परीक्षा शुल्काच्या दुप्पट फी आकारून **दिनांक ०७ ऑक्टोबर २०१५** पर्यंत परीक्षा आवेदन पत्र स्विकारण्यात येतील त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत परीक्षा आवेदनपत्र स्विकारल्या जाणार नाही याची सर्व महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

**टिप:–**

**१) आवश्यक प्रपत्राकरीता विद्यापीठाचे संकेतस्थळ http:gondwana.digitaluniversity.ac**

**2) परीक्षा शुल्क विद्यापीठाचे परीपत्रक क्रं/गोवि/वित्त व लेखा विभाग/२३/२०१४, दि. २५/०९/२०१४ नुसार आकारावे( विद्यापीठाचे दि. २८/१०/२०१४ चे पत्र )**

**३) विद्यापीठाला कधीही गरज भासल्यास महाविद्यालयाकडून परिक्षा आवेदनपत्र मागविण्यात येईल. याची सर्व महाविद्यालयाने नोंद घ्यावी.**

परीक्षा मंडळाच्या निर्णयानुसार

परीक्षा नियंत्रक
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी:– १. मा.कुलगुरू यांचे स्वीय सहाय्यक,गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२. मा.कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३.मा.वित्त व लेखाधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहा.कुलसचिव (परीक्षा पुर्व)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली